MHYA150006852018

-

नियमित दिवाणी दावा क्र.२४/२०1८ मधील निशाणी क्र. ४८ वरील आदेश

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज नि क्र ४४ वरील आदेशाप्रमाणे रुपये १०००/– कॉस्टची रक्क्म भरुण दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्याकरीता अर्ज सादर केला आहे.

२. अर्जदारांनी नमुद केले की, दिनांक ०५/१०/२०२२ रोजी मरन पावली वादी चे वारस रेकॉर्डवर घेण्या करीता वादीचे वारसांनी दिनांक १६/१०/२०२३ रोजी अर्ज दाखल केला असुन सदर अर्ज निशाणी क्रमांक ४७ मंजुर झाला. दिनांक १५/०२/२०२४ रोजी मंजुर झाला. परंतु मय्यत वादी चे पती मोतीराम कवडु हाके हे अर्धांगवायुच्या आजाराने ग्रस्त असल्यामुळे दिनांक १३/०२/२०२४ पासुन विद्यमान न्यायालयात हजर राहू शकले नाही.

३. करीता वादीचे वारसांना प्रस्तुत दाव्या मध्ये निशाणी क्रमांक ४७ वरील आदेशा प्रमाणे रुपये १०००/– कॉस्टची रक्कम भरण्याची परवानगी देवुन दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी. अर्जदारांनी अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

४. प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे सादर करुन अर्जास विरोध दर्शविला. सदरचा दावा २०1८ मध्ये दाखल झाला तेव्हापासुन आज पर्यंत वादी यांनी

कधिच तरतुदिचे पालण करुन सदरचा दावा चालविला नाही सदर दावा पुराव्याला लागल्यानंतर वादी यांनी तीन वर्ष आपला पुरावा दिला नाही. त्यानंतर त्यांचा दिनांक ०५/१०/२०२२ रोजी मृत्यु झाला. त्यानंतर एक वर्षाने त्यांचे वारसाने वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी अर्ज सादर केला. तरीही परंतु वि. न्यायालयाने त्याना वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी अर्ज मंजुर केला. निशाणी ४४ वर दिनांक १५/०२/२०२४ रोजी आदेश पारीत केला व वादी यांना वारस रेकॉर्डवर घेण्याचा आदेश पारित केला त्यामध्ये १४ दिवसाचे आत वारस रेकॉर्डवर घेण्याचे आदेश दिले परंतु त्यानंतर त्या आदेशाचे वादीने पालण केले नाही व त्या आदेशा नंतर निशाणी ४८ प्रमाणे कॉस्टची रक्कम भरुण दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याचा अर्ज संयुक्त कारण नमुद न करता दाखल केला आहे. प्रस्तुतचा अर्ज कायद्याच्या तरतुदीत बसत नाही सदरचा अर्ज खारीज होण्यास पात्र आहे. म्हणुन अर्ज खारीज करण्यात यावा अशी प्रतिवादीनी विनंती केली.

५. अभिलेखावर दस्तऐवजाची पाहणी केली असता दिसुन येते की प्रस्तुतचा निरंतर मनाई हुकुमाच्या ताकीदीच्या आदेशाकरीता दाखल केलेला आहे. मुळ वादी गंगुबाई हके हया दिनांक ०५/१०/२०२२ रोजी मृत्यु पावल्या. त्यानंतर वादीच्या वारसांनी दिनांक १६/१०/२०२३ रोजी वारस अभिलेखावर घेण्याचा अर्ज निशाणी क्र ४४ वर सादर केला. सदरचा अर्ज दिनांक १५/०२/२०२४ रोजी मंजुर करण्यात आला, परंतु वादींनी आजरोजीपर्यंत सदर आदेशाचे अमलबजावणी केली नाही. सदर निशाणी क्र ४४ वरील आदेशाची पुर्तता करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दिनांक १०/०७/२०२४ रोजी सादर केला.

६. मुळ वादी गंगुबाई हाके यांच्या वारसांना दाव्यामध्ये समाविष्ट करणे दावा गुणोत्तरावर निकाली काढण्यासाठी आवश्यक आहे. अर्जदारांनी वारस म्हणुन दाव्यामध्ये समाविष्ट होण्यासाठी अधिकचा विलंब लावलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये दावा निकाली काढण्यासाठी गंगुबाई हाके यांच्या वारसांना समाविष्ट करणे आवश्यक आहे व अर्जदारांनी निशाणी क्र ४४ वरील आदेशाची पुर्तता करण्यासाठी केलेल्या विलंबाबत त्यांच्यावर योग्य खर्च लादणे योग्य व रास्त आहे, सदरचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीला कोणत्याही प्रकारची क्षती व हाणी पोहचत असल्याचे दिसुन येत नाही. वरील सर्व बाबींचा एकत्रितरित्या विचार करता मी या निष्कर्षाला आलो आहे की, वादींचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्याकरीता केलेल्या विलंबाकरिता प्रतिवादींना रक्कम रुपये ४०००/- पुढील तारखेपर्यंत देण्यात यावे.

३. अर्जदारांनी दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्तीची प्रत पुढील तारखेपर्यंत सादर करावी.

४. अर्जदारांनी पुढील तारखेपर्यंत दुरुस्ती न केल्यास त्यांच्या विरुद्ध योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला)

GAJANAN CHANDRAKANT FULZALKE
Digitally signed by GAJANAN CHANDRAKANT FULZALKE
Date: 2025.07.02 17:49:41 +0530

नेर. (जी. सी. फुलझळके)

दिनांक – ०२.०७.२०२५ दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, नेर.